वाचले : १)दीपस्तंभ बहुउददेशीय संस्था यांचेकडील दि. २५ मे २०१९ रोजीचे पत्र.

२)सहा. आयुक्त, नागरवस्ती विकास योजना विभाग यांचेकडील पत्र क्र. नावियो/१/कावि/३४८/२०१९, दि. ६/६/२०१९.

३)शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग यांचेकडील पत्र क्र. मा/शि/२/कावि/६८२/२०१९ दि. ६/६/२०१९

४)मा.महापालिका सभा ठराव क्र. ४२१ दि. २० /६/२०१९

५)मा.आयुक्त यांचेकडील दि.११/०९/२०१९ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भूमि आणि जिंदगी विभाग
क्र. भूजि/९/कावि/२९२/२०१९
दि. ११/९/२०१९

**विषय : पिंपरी चिंचवड मनपा व दीपस्तंभ बहुउद्येशीय संस्था यांचे संयुक्त विद्यमाने "मनोबल" हा दिव्यांग, अनाथ व वंचित घटकातील विद्यार्थ्यांसाठी प्रकल्प चालू करणेबाबत...**

आदेश,

वाचले क्र. १ अन्वये दीपस्तंभ बहुउददेशीय संस्था यांनी पिंपरी चिंचवड मनपा परिसरात "मनोबल" दिव्यांग , अनाथ व वंचित घटकातील युवक – युवतींसाठी निवासी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण प्रकल्प संयुक्त उपक्रमाव्दारे चालू करण्याबाबत विनंती केलेली आहे. सदर संस्था या क्षेत्रात १३ वर्षापासून कार्यरत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका व दीपस्तंभ बहुउशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने "मनोबल" हा दिव्यांग, अनाथ व वंचित घटकातील विद्यार्थ्यांसाठीचा प्रकल्प चालू झाल्यास खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय प्रस्थापित होऊ शकेल. या प्रकारचा प्रकल्प राबविणारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही देशातील पहिली महानगरपालिका असेल.

वाचले क्र. २ अन्वये सहा. आयुक्त, नागरवस्ती विकास योजना विभागाने सदर प्रकल्प हा उपयुक्त ठरु शकेल असा अभिप्राय दिलेला आहे.

वाचले क्र. ४ अन्वये मा. महापालिका सभा ठराव क्र. ४२१ दि. २० /६/२०१९ अन्वये सदरचा "मनोबल" हा प्रकल्प पिंपरी चिंचवड मनपा व दीपस्तंभ बहुउद्येशीय संस्था यांच्या संयुक्त उपक्रमाव्दारे राबविण्यास मान्यता देणेत आलेली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८ सदरचा "मनोबल" हा प्रकल्प संयुक्त उपक्रमाव्दारे राबविण्यास खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार मान्यता देत आहे.

१) पिंपरी चिंचवड मनपाची पिंपळे गुरव येथील माध्यमिक शाळेची (जुनी) इमारत "मनोबल" या प्रकल्पासाठी ३ वर्ष कालावधीसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. हा संयुक्त प्रकल्पाचा घटक म्हणून वापरण्यात येत असल्याने सदर संस्थेकडून कोणत्याही प्रकारचे अनामत रक्कम (सिक्युरिटी डिपॉजिट) घेतलेली नाही.

२)सदर ठिकाणी असलेल्या इमारतीचा वापर अन्य कोणत्याही कारणासाठी, समारंभासाठी करता येणार नाही. कोणत्याही व्यक्तीस सदर जागा भाड्याने अथवा देणगी स्वीकारून वापरासाठी देता येणार नाही.

३)सदर प्रकल्पाच्या संयुक्त भागीदारीत मनपाने केवळ इमारत उपलब्ध करुन द्यावयाची आहे. उर्वरीत आवश्यक असणाऱ्या सर्व सोयी सुविधांची दीपस्तंभ या संस्थेने स्वत: पुर्तता करावयाची आहे.

४)दीपस्तंभ संस्थेने सदरचा मनोबल प्रकल्प राबविताना इमारतीतील सर्व साधन-सुविधा सुस्थितीत ठेवावयाच्या आहेत.

५)"मनोबल" या उपक्रमाकरीता जोपर्यंत जागा वापरात आहे तोपर्यंत देय होणारे सर्व प्रकारचे शासनाचे कर भरणेची जबाबदारी दीपस्तंभ संस्थेची राहील.

६)सदर उपक्रमाकरीता वापरात असलेल्या कालावधीकरीता पाणी, वीज जोडणी(कनेक्शन) घेणेकरीता मनपाकडुन नाहरकत दाखला/प्रमाणपत्र देण्यात येईल.

७)सदर उपक्रमाकरीता ३ वर्षापर्यंत जागेचा वापर करता येईल. त्यापुर्वी अन्य जागा उपलब्ध झाल्यास सदर ठिकाणी प्रकल्प स्थलांतरीत करावा लागेल.

८)सदर प्रकल्पाचे काम बंद करावयाचे असल्यास जागेचा ताबा मूळ स्वरूपात देण्याची जबाबदारी लिहून देणार संस्थेवर राहील.

९) "मनोबल" हा प्रकल्प राबविताना संस्थेत प्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे, सुरक्षिततेची काळजी घेणे ही जबाबदारी संस्थेची राहील. तसेच सदरचा प्रकल्प राबविताना कोणत्याही प्रकारची अनुचित घटना, अपघात घडल्यास, कायदेशीर बाब उदभवल्यास त्याबाबत सदर संस्था जबाबदार राहील.

१०)सदर संस्थेबाबत दिव्यांग, अनाथ वंचित युवक – युवतींना कोणत्याही कारणास्तव त्रास झाल्यास, कोणत्याही प्रकारची तक्रार, कायदेशीर बाब उदभवल्यास त्याबाबत सदर संस्था जबाबदार राहील.

११)पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस सदर जागेची आवश्यकता भासेल त्यावेळी एक महिन्याची नोटीस दिलेनंतर दीपस्तंभ संस्थेने सदर जागेचा ताबा मनपास देणे बंधनकारक राहील.

१२) पिंपरी चिंचवड मनपा व दीपस्तंभ बहुउद्देशीय संस्था यांचे संयुक्त विद्यमाने "मनोबल" हा प्रकल्प राबविताना मनपाकडुन केवळ जागा वापरास परवानगी देण्यात आली आहे. तसेच प्रकल्पासाठी आवश्यक ते फर्निचर, अंतर्गत दुरुस्त्या व दैनंदिन प्रकल्प राबविणेसाठीची संपुर्ण जबाबदारी संस्थेने घ्यावयाची असून आवश्यक सोई-सुविधा प्रकल्पासाठी इतर आवश्यक सोयी – सुविधा संस्थेने त्यांचे स्वखर्चाने उपलब्ध करावयाच्या आहेत.

१३) याकामी केलेला पत्रव्यवहार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी, महापालिका ठराव, शासन निर्णय हे अटी व शर्तीचा अविभाज्य भाग राहील.

१४) दीपस्तंभ बहुउद्देशीय संस्था व पिंपरी चिंचवड मनपा यांचे संयुक्त विद्यमाने "मनोबल" या प्रकल्पासाठी इमारतीची जागा वापराबाबत यांना परवानगी दिलेली असल्याने जागेबाबत कोणत्याही न्यायालयात अथवा लवादापुढे वाद उपस्थित केला जाणार नाही. याबाबतीत आयुक्तांचा निर्णय अंतिम राहील.

१५)सदर प्रकल्प राबविताना कोणत्याही युवक-युवतींकडुन कोणत्याही प्रकारचे शुल्क, आकार, फी, चार्जेस दीपस्तंभ संस्थेस घेता येणार नाही. त्याबाबतीत कोणाकडुनही तक्रार उदभवल्यास सदर संस्थेस याबाबत जबाबदार धरणेत येईल.

१६) सदरच्या प्रकल्पासाठी आवश्यक ते कर्मचारी नेमण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

१७)याखेरीज सदर प्रकल्प रदद करणे, त्यात अशंत: बदल करणे, पुर्णत: बदल करणे याबाबतचा अधिकार मा. आयुक्त यांनी राखून ठेवलेले आहेत.

सबब, मी, आयुक्त, पिंपरी चिंचवड मनपा उपरोक्त वाचले क्र. १ ते ५ व नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून "मनोबल" हा प्रकल्प पिंपरी चिंचवड मनपा व दीपस्तंभ बहुउददेशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यास मान्यता देत आहे.

(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

प्रति,
दिपस्तंभ बहुउद्देशिय संस्था जळगाव
प्रत-१) मा. आयुक्त कक्ष
२) नगरसचिव विभाग
३) करसंकलन विभाग
४) ड क्षेत्रिय कार्यालय
५) माध्यमिक शिक्षण विभाग